



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक ८३, गुरुवार २० फेब्रुवारी २०२५ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

## पुणे-शिरुर उड्डाणपुलाच्या कामास लवकरच सुरुवात!

### खासदार नीलेश लंके यांची माहिती | पारनेर, नगरकरांचा प्रवास होणार सुखद

अहिल्यानगर : प्रतिनिधी

**पारनेर, नगरपासून जवळ असलेल्या पुणे शहराकडे जाताना शिक्रापुरपासून पुढे मोठया वाहतूक कोंडीला समोरे जावे लागत असल्याने या मार्गावरील प्रवाशांना नेहमीच मनस्ताप सहन करावा लागतो. मात्र प्रवाशांची ही डोकेदुखी येत्या काही वर्षात दुर होणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांच्या संकल्पतेतून खराडी बायपास ते शिरूर असा ६० किलोमीटर अंतराचा तीन मजली उड्डाणपुलाच्या कामास एप्रिल महिन्यात सुरूवात होणार असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.**

छत्रपती संभाजी नगर-अहिल्यानगर-पुणे या महामार्गाचे सहा पदरीकरण करून रस्त्याचे काँक्रीटीकरण करावे अशी मागणी खा. लंके यांच्यासह शिरूरचे खा. डॉ. अमोल कोल्हे व छत्रपती संभाजी नगरचे खा. संदिपान भुमरे यांनी मंत्री नितिन गडकरी यांच्याकडे यापूवच केलेली आहे. या मागणीच्या पाठपुराव्यासंदर्भात खा. लंके हे संसदेच्या आधिवेशनादरम्यान गडकरी यांच्या भेटीला गेले असता गडकरी यांनी खराडी बायपास ते शिरूर या तीन मजली उडडाण पुलाचे काम लवकरच सुरू होत असल्याचे तसेच शिरूर ते संभाजीनगर दरम्यानच्या रस्त्याबाबत राज्य शासनाशी चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



### अतिक्रमणे हटविली

शिरूर ते पुणेदरम्यान वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी तीन मजली उड्डाण पुलासंदर्भात मंत्री गडकरी यांनी यापूवच घोषणा केली होती. त्या अनुषंगाने या रस्त्यालगतची अतिक्रमणे यापूवच हटविण्यात आली आहेत.

### अशी असेल वाहतूक व्यवस्था

तीन मजल्यांपैकी सर्वात वरच्या मजल्यावरून महामेट्रो धावणार असून दुसरा मजला चारचाकी वाहनांसाठी असेल. तळमजल्यावरून अवजड वाहने जातील व येतील. शिरूर, रांजणगांव गणपती, शिक्रापूर, लोणीकंद व खराडी येथे या तीन मजली उडडाणपुलास बाहय मार्ग जोडण्यात येणार आहेत.

### राज्यातील पाहिला तीन मजली रस्ता !

खराडी बायपास ते शिरूर हा राज्यातील पहिला तीन मजली उड्डाणपुल असलेला रस्ता ठरणार आहे. हा अत्याधुनिक एलिव्हेटेड फलायओव्हर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून बांधण्यात येणार आहे.

### राज्य शासनाच्या भुमिकेवर प्रश्नचिन्ह

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाकडून पुणे ते संभाजीनगर या रस्त्याचे बांधकाम व्हावे यासाठी तीन्ही खासदार आग्रही असताना राज्य शासनाने अलिकडेच पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर या रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून तीन टप्प्यात करण्याची घोषणा केली होती. राज्य शासनाच्या या धोरणास खा. लंके यांच्यासह इतर दोन्ही खासदारांनी विरोध केला असून राज्य सरकारकडून हा रस्ता पुर्ण होईल किंवा नाही यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. या महामार्गाचे तीन टप्पे करून त्यावर टोल आकारणे अन्यायकारक असल्याचे नमुद करून त्याचा सामान्यांसह औद्योगिक विकासाला फटका बसेल अशी भीतीही खा. लंके यांनी मंत्री गडकरी यांच्याशी चर्चा करताना व्यक्त केली.

## किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव!

### मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी जोजवला शिवरायांचा पाळणा

जुन्नर : देविराज आबूज

**किल्ले शिवनेरीवर मोठ्या उत्साहात आज ३९५ वा शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी शिवरायांचे जन्मस्थान असलेले किल्ले शिवनेरीला फुलांनी सजवण्यात आलं होतं. शिवजयंती निमित्त शिवनेरीवर शासकीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवरायांना नमन केलं. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार आणि इतर अनेक नेत्यांची प्रमुख उपस्थिती होती.**

शिवनेरी किल्ल्यावर ज्याठिकाणी शिवरायांचा जन्म झाला तिथे अत्यंत दिमाखात आणि पारंपारिक पद्धतीने त्यांची ३९५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी शिवजन्माचा पाळणा जोजावला. त्यानंतर महिलांनी नाव ठेवत शिवाजी, शिवाजी, शिवाजी असं सांगितलं. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शिवाई देवीची महापूजा देखील करण्यात आली.



### साहसी क्रीडा प्रकारांचे सादरीकरण

शिवनेरी किल्ल्यावर शिवभक्तांकडून मोठ्या उत्साहात शिवरायांच्या नावाचा गजर करण्यात आला.यावेळी शिवनेरीवर अनेक साहसी क्रीडा प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी लहान लहान मुलांनी या साहसी क्रीडा प्रकारांचे सादरीकरण करुन साऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं. शिवजयंतीनिमित्त शिवनेरी किल्ल्यावर मर्दानी खेळांचे आयोजनही करण्यात आले होते.शिवजन्मोत्सवावेळी शिवभक्तांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणा दिल्या. यावेळी संपूर्ण परिसर हा शिवरायांच्याा नावाने दुमदुमला.

### ऊर्जा आणि प्रेरणा !

ज्यावेळी या गडकिल्ल्यांवर येतो, त्यावेळी एक वेगळी ऊर्जा आणि प्रेरणा मिळते. शिवाजी महाराजांचे किल्ले फक्त पाहण्यासाठीच नाही तर त्यामुळे त्यांचा आणि मावळ्यांचा पराक्रम देखील दिसतो. देश विदेशात या गडकिल्ल्यांची लोकप्रियता आहे.शिवाजी महाराजांसारखा दुसरा कुठलाच आदर्श असू शकत नाही. किल्ले आणि जुन्या मंदिरांचं संवर्धन आम्ही सुरू केले. याठिकाणी येणाऱ्या शिवभक्तांना सुविधा मिळाल्या पाहिजेत.मी अगोदर मुख्यमंत्री होतो आणि आता देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत आणि आम्ही सर्वजण टीम म्हणून या राज्याचा आणि किल्ल्यांचा विकास करू.

एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री

## पुण्यात अवतरली शिवशाही!

### शिवछत्रपतींना मानवंदना | मिरवणुकीमध्ये ९६ स्वराज्यरथ सहभागी




पुणे : प्रतिनिधी

**शिवजयंती महोत्सव समिती पुणेच्या वतीने लालमहाल येथून भव्यदिव्य मिरवणुक काढण्यात आली. यंदा या मिरवणुकीच १३ वं वर्ष आहे. जय शिवाजी जय भवानीचा जयघोष करत स्वराज्यातील सरदारांच्या घराण्यांच्या वंशजांच्या हस्ते लालमहालातील जिजाऊंच्या पुतळयाला पुष्पहार घालून जिजाऊ माँसाहेब शहाजी महाराज शिवज्योत रथावरील शिवज्योत प्रज्वलन करून मिरवणुकीला सुरुवात झाली.**

फुलांची आकर्षक सजावट असलेला जिजाऊ माँसाहेब शहाजी महाराज शिवज्योत, मुख्य स्वराज्यरथ, एकापाठोपाठ येणारे सरदारांचे,मावळ्यांचे, वीर मातांचे स्फुर्ती देणारे ९६ स्वराज्यरथ, महाराणी ताराराणी शौर्य पथकातील ५१ रणरागिणींच्या मर्दानी खेळांची चित्तथरारक मानवंदना आणि ढोलताशा पथकाचं सुरेख वादन, तर सनई-चौघडयांचे मंगलमय सूर, तसेच हजारोंच्या संख्येने पारंपरिक पोशाखात उपस्थित महिला आणि शिवभक्त यांनी मिरवणुकीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या सोहळ्याचे उदघाटन

उर्वरीत पान ३ वर

### छत्रपतींच्या ऐक्याचा विचार आजही

छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष आहेत. शिवाजी महाराजांचा ऐक्याचा विचार आजही पाहायला मिळत आहे. पुण्यात शिवजयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असून सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येत आहेत. यानिमित्ताने शिवरायांसोबत असलेले सरदार, मावळे यांचे स्मरण होते.

खासदार छत्रपती उदयनराजे भोसले.

## सहाय्यक लेखाधिकारी अटकेत!

### सेवानिवृत्त शिक्षकाकडून स्वीकारली लाच सहायक

अहिल्यानगरः प्रतिनिधी



**सेवानिवृत्त शिक्षकाकडून ८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना माध्यमिक शिक्षण कार्यालयातील वेतन व भविष्य निर्वाह विभागातील सहायक लेखाधिकारी अशोक मनोहर शिंदे (४९, रा. तुळसाई पार्कमागे, गावडे मळा, पाईपलाईन रस्ता, सावेडी, अहिल्यानगर) याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक शिंदे याला अटक करण्यात आली आहे.**

तक्रारदार शिक्षक हे ३ जून २०२२ रोजी शिक्षक म्हणून निवृत्त झाले. परंतु त्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम आजपर्यंत मिळालेली नाही. त्यासाठी त्यांनी माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयात पाच ते सहा वेळा चकरा मारल्या. वेतन व भविष्य निर्वाह निधी विभागातील सहायक लेखाधिकारी अशोक शिंदे याने शिक्षकाला तुमचे काम खूप जुने आहे ते करून देण्यासाठी बक्षीस म्हणून २० हजार रुपये द्यावे लागतील, अशी लाचेची मागणी केली.


शिक्षकाने याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अहिल्यानगर कार्यालयाकडे केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने काल, मंगळवारी त्याची पडताळणी केली. याच दरम्यान सहायक लेखाधिकारी अशोक शिंदे याने तक्रारदार सेवानिवृत्त शिक्षकाची भविष्य निर्वाह निधीची फाईल मंजूर करण्यासाठी लाचेच्या पहिल्या हप्त्याची पंचासमक्ष मागणी केली. त्यानुसार माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयातच पथकाने सापळा रचला व सहायक लेखाधिकारी अशोक शिंदेला पंचासमक्ष ८ हजार रुपये लाच स्वीकारताना पकडण्यात आले.

उर्वरीत पान ३ वर

## शिवबांच्या जन्मोत्सवाला गालबोट

### मिरवणुकीतून घरी जाताना चाकूचे वार हेमंतच्या हत्येने जळगाव हादरलं

जळगाव: प्रतिनिधी



**संपूर्ण राज्यात आज छत्रपती शिवाजी महाराजांचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. मात्र, या सोहळ्याला जळगावात गालबोट लागल्याची घटना घडली आगे. जळगावात किरकोळ कारणावरून एका २० वर्षीय तरूणावर चाकुने वार करत त्याची निर्घृण हत्या केल्याची घटना शहरातील बाहेरपुरा भागात मध्यरात्री १२:३० वाजता घडली. घटनेतील मारेकऱ्याला पाचोरा पोलिसांनी जेरबंद केले असून घटनेप्रकरणी मारेकऱ्याविरुद्ध पाचोरा पोलीस स्टेशनमध्ये खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांकडून मिळालेली प्राप्त माहिती अशी की, १८ फेब्रुवारीला मध्यरात्री रात्री १२ वाजेच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज चौकातुन शिव जयंती निमित्त मिरवणूक काढण्यात आली होती. १२ वाजून १५ मिनिटांनी मिरवणूक संपल्यानंतर हेमंत संजय सोनवणे (वय वर्ष २०, रा. जुना माहेजी नाका, महात्मा फुले नगर, पाचोरा) यास शहरातील बाहेरपुरा येथे रोहित गजानन लोणारी (वय वर्ष २०, रा. शिव कॉलनी, पाचोरा) याने किरकोळ कारणावरून धारदार चाकूने पोटात वार करुन घटना स्थळावरुन पसार झाला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या हेमंतला रुग्णालयात नेलं पण

घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक अशोक पवार आणि

उर्वरीत पान ३ वर

## कर्करोगातील नवी लस अंतिम टप्प्यात !

### आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांचा दावा



छ.सभाजीनगर : प्रतिनिधी


**कर्करोगावर नवे लस संशोधन अंतिम टप्प्यात असून त्याची मानवी चाचणी सुरू झाली आहे. येत्या सात-आठ महिन्यांत हे काम पूर्ण झाल्यानंतर ती सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होईल, असा दावा 'आयुष' मंत्रालयाचा स्वतंत्र कारभार पाहणारे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला.**

अर्थसंकल्पाबाबत जागृतीसाठी मंत्र्यांना दिलेल्या कार्यक्रमाचा भाग म्हणून त्यांनी मंगळवारी पत्रकार बैठक घेऊन अर्थसंकल्प आणि त्यातील आरोग्य क्षेत्राच्या तरतुदीची माहिती दिली.

कर्करोगाचे निदान लवकर व्हावे यासाठी जिल्हा रुग्णालयात एक विशेष कक्ष उभारण्यात येणार आहे. याचबरोबर आता कर्करोग होऊ नये म्हणून लस विकसित केली जात आहे. ही लस लवकर उपलब्ध होऊ शकेल. पुढील पाच वर्षांत ७५ हजार डॉक्टरांच्या रिक्त जागा भरण्यात येणार असून पुढील वर्षात १० हजार डॉक्टरांची भरती केली जाणार आहे. एकूण अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्यासाठी ९९ हजार ८५८. ५६ लाख कोटी रुपयांचा निधी असून यामध्ये आयुष मंत्रालयाचा चार हजार कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित आहे, असे प्रतापराव जाधव यांनी यावेळी सांगितले.







# चंदेरी

## तसं फक्त माझ्या आयुष्यात घडलं का गुन्हेगार समजायला?

### नागा चैतन्य घटस्फोटावर झाला व्यक्त



**दाक्षिणात्य स्टार नागा चैतन्य सध्या त्याच्या 'थंडेल' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने नागा चैतन्यने मुलाखत दिली. या मुलाखतीत तो त्याच्या दुसऱ्या लग्नानंतर पहिल्यांदाच घटस्फोटाबद्दल व्यक्त झाला आहे. नागा चैतन्यने दोन महिन्यांपूर्वी अभिनेत्री सोभिता धुलिपालाशी लग्न केलं. त्याचं पहिलं लग्न आघाडीची दाक्षिणात्य अभिनेत्री समांथा रुथ प्रभू हिच्याशी झालं होतं, पण त्यांचा घटस्फोट झाला.**

नागा चैतन्य म्हणाला, की आम्हाला आपापल्या मार्गाने जायचं होतं. आमची काही कारणं होती. त्यामुळे आम्ही हा निर्णय घेतला आणि आम्ही एकमेकांचा आदर करतो. यापेक्षा जास्त स्पष्टीकरणाची गरज का आहे? मला खरंच कळत नाही. मला आशा आहे की प्रेक्षक आणि माध्यमे या गोष्टीचा आदर करतील. कृपया आमचा आदर करा आणि आम्हाला या बाबतीत प्रायव्हसी द्या, असे तो म्हणाला. मी खूप चांगल्या पद्धतीने आयुष्यात पुढे गेलो आहे आणि तीही आयुष्यात पुढे गेली आहे. मला पुन्हा प्रेम मिळालंय, मी खूप आनंदी आहे, असेही त्याने सांगितले. लोकांनी माझ्याबद्दल सकारात्मक राहावं. हे फक्त माझ्या आयुष्यात घडलंय असं नाहीये, मग मला गुन्हेगारासारखं का वागवलं जातंय?, असा सवालही नागा चैतन्यने उपस्थित केला.



लग्न संपवण्याच्या निर्णयाबद्दल बोलताना नागा चैतन्य म्हणाला, की हा निर्णय समोरच्या व्यक्तीच्या भल्यासाठीच होता. निर्णय काहीही असला तरी तो खूप विचार करून घेतला गेला होता. हा निर्णय एका रात्रीत घेतलेला नाही. मी हे बोलतोय कारण हा माझ्यासाठी अतिशय संवेदनशील विषय आहे. मी एका विखुरलेल्या कुटुंबातून आलो आहे, त्यामुळे तो अनुभव कसा असतो हे मला माहीत आहे. नातं तोडण्यापूर्वी मी हजार वेळा विचार करेन. कारण मला त्याचे परिणाम माहीत आहेत. हा परस्पर सहमतीने घेतलेला निर्णय होता, असे त्याने सांगितले. नागा चैतन्य आणि समांथा रुथ प्रभू यांचे लग्न २०१८ मध्ये झाले होते. २०२१ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. नागा चैतन्यने डिसेंबर २०२४ मध्ये सोभिता धुलिपालाशी दुसरं लग्न केलं.

## शुभम पाटीलने घेतली नवीन कार

**'लाखात एक आमचा दादा' ही मालिका खूप लोकप्रिय आहे. या मलिकेतील कलाकारांना प्रेक्षकांचं खूप प्रेम मिळतंय. या मालिकेतील एक कलाकार सध्या चर्चेत आहे. त्याचं कारण म्हणजे त्याने खरेदी केलेली नवीकोरी कार आहे. मालिकेतील जिमसीना म्हणजेच अभिनेता शुभम पाटील याने नवीन कार खरेदी केली आहे. त्याने इन्स्टाग्रामवर याबद्दल एक पोस्ट केली आहे. शुभमने त्याच्या कारचे फोटोदेखील पोस्ट केले आहेत. वाढदिवसानिमित्त त्याने नवीन कार घेतली आहे. नवीन कार घेतल्यावर शुभम सांगलीतील गणपती मंदिरात गेला होता.**

स्वतःच्या वाढदिवसाला गिफ्ट म्हणून १३ लाख किमतीची ह्युंदाई क्रेटा ही गाडी खरेदी केली आहे. शुभम पाटील हा मूळचा सांगलीचा आहे. नवीन गाडी गणराया सदैव तुझा आशीर्वाद माझ्या पाठीशी असू दे... असं कॅप्शन शुभमने या फोटोंना दिलं आहे. शुभम पाटीलने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट केल्यावर चाहते त्याचं अभिनंदन करत आहेत. अनेक सांगलीकरांनी माहीत असतं तर तुला भेटायला आलो असतो, असंही म्हटलं आहे. दरम्यान, शुभम पाटीलच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तो झी मराठीच्या 'तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवं' या मालिकेतही झळकला होता. त्याने म्युझिक व्हिडीओदेखील केले आहेत. शुभमला फिटनेसची खूप आवड आहे. तो त्याचे वर्कआउट करतानाचे व्हिडीओ सोशल मीडिया अकाउंटवर पोस्ट करत असतो. तो कामाबद्दल व वैयक्तिक आयुष्यातील अपडेट्सही चाहत्यांबरोबर शेअर करत असतो.



## दुसऱ्या लग्नाबद्दल निधी म्हणाली...

**'बिग बॉस १८' चा विजेता करणवीर मेहराची दुसरी पत्नी अभिनेत्री निधी सेठ हिने नुकतंच जानेवारी महिन्यात दुसरं लग्न केलं. निधीचा पती संदीप कुमार हा बंगळुरूमध्ये बिझनेसमन आहे. दुसऱ्या लग्नानंतर निधी प्रचंड आनंदी आहे. निधी पहिल्यांदाच तिच्या पतीबद्दल आणि तिच्या दुसऱ्या लग्नाबद्दल व्यक्त झाली आहे. आयुष्य पुन्हा प्रेमाने भरलंय, असं वाटत असल्याचं निधीने म्हटलं आहे.**

निधी सेठ म्हणाली, की मला असं वाटतंय की माझे आयुष्य पुन्हा एकदा प्रेमाने भरले आहे. मला माझ्यातही बरेच चांगले बदल जाणवत आहेत. माझ्या आजूबाजूला सकारात्मक विचारांचे लोक आहेत. संदीप परिपक्व, समजूतदार आणि पाठिंबा देणारा जोडीदार आहे, असे ती म्हणाली. 'कामना' आणि 'श्रीमद भागवत महापुराण' सारख्या टीव्ही शोमध्ये काम करणारी निधी आता बेंगळुरूमध्ये स्थायिक झाली आहे. तिने अभिनय सोडला आहे का? असं विचारल्यावर ती म्हणाली, सध्या, मी इंटिरिअर डिझायनिंग करतेय. हे काम मला आवडत आहे आणि त्यातच मी व्यस्त आहे. कारण त्यामुळे माझं काम आणि वैयक्तिक आयुष्य दोन्हीत संतुलन साधण्यास मला मदत होतेय. पण मला अभिनयासाठी चांगली ऑफर आली तर मी नक्कीच काम करेन. मला कशी भूमिका मिळते, त्यावरून मी काम करायचं की नाही ते ठरवेन, असं निधीने नमूद केलं. निधीचं यापूर्वी 'बिग बॉस १८' चा विजेता अभिनेता करण वीर मेहरा याच्याशी लग्न झालं होतं. त्यांचं नात कडवटपणामुळे संपलं होतं. करण बिग बॉसमध्ये असताना अनेकदा निधीचा विषय निघाला आणि त्याबद्दल बोललं गेलं, यावर निधीने नाराजी व्यक्त केली आहे. दुर्दैवाने सोशल मीडियावर कोणतेही फिल्टर नाही, कोणीही खरं-खोटं तपासत नाही हे खेदजनक आहे. घटस्फोटानंतरची माझी एक जुनी मुलाखत ज्या प्रकारे वापरली गेली, ते पाहून मला धक्का बसला. काही लोकांना उगाच ड्रामा करण्यासाठी खोट्या गोष्टी पसरवायच्या असतात, असं निधी म्हणाली. निधीचा पती या सगळ्या गोष्टी कशा हाताळतो, तेही तिने सांगितलं. खरं तर संदीपसाठी या गोष्टींना सामोरं जाणं फार अवघड नाही. कारण तो खूपच परिपक्व आहे. तसेच मी एक अभिनेत्री असल्याने माझं आयुष्य लाइमलाइटमध्ये असेल याची त्याला कल्पना आहे. तो माझ्यावर प्रेम करतो, मी जे काम करते त्यामुळे माझ्यावर प्रेम करत नाही, असं निधी म्हणाली.



**बॉलीवूड अभिनेता अभिषेक बच्चनने ५ फेब्रुवारी रोजी त्याचा ४९ वा वाढदिवस साजरा केला. त्याच्या वाढदिवसानिमित्त पत्नी ऐश्वर्या राय बच्चनने एक छान पोस्ट केली. ऐश्वर्याने अभिषेकच्या बालपणीचा जुना फोटो शेअर करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

## ऐश्वर्या रायच्या पती अभिषेकला खास शुभेच्छा



ऐश्वर्याने ही पोस्ट शेअर केल्यानंतर चाहत्यांनी त्यावर विविध प्रकारच्या कमेंट्स केल्या आहेत. ऐश्वर्याच्या या प्रेमळ पोस्टनंतर चाहत्यांना खात्री पटली की घटस्फोटाच्या बातम्या केवळ अफवा होत्या, त्या निराधार होत्या. एका युजरने 'निम्रतला सॉरी म्हणा' अशी कमेंट केली, तर दुसऱ्याने लिहिलं की, 'आम्ही निम्रतची माफी मागितली पाहिजे.' काही लोकांनी या जोडप्याच्या कथित घटस्फोटाची खिल्ली उडवली, तर एका कमेंटमध्ये 'घटस्फोट होत नाहीये' असं लिहिलं. दरम्यान, सोशल मीडियावर १४.६ मिलियन फॉलोअर्स असलेली ऐश्वर्या इन्स्टाग्रामवर फक्त एकाच व्यक्तीला फॉलो करते आणि ती म्हणजे तिचा नवरा अभिषेक होय. यावरूनही एका युजरने कमेंट केली आहे. ऐश्वर्या इन्स्टाग्रामवर फक्त एक व्यक्तीला फॉलो करते, त्यावरून तिचं व तिच्या पतीचं नातं किती घट्ट आहे हे दिसून येतं, असं युजरने लिहिलं आहे. अनंत अंबानी व राधिका मर्चंट या लग्नातील कार्यक्रमांना हे दोघेही वेगवेगळे आले होते, तसेच ऐश्वर्याच्या वाढदिवसाला बच्चन कुटुंबातील कोणतेही सदस्य दिसले नव्हते, तसेच कोणीही तिच्यासाठी पोस्टदेखील केली नव्हती. त्यामुळे या दोघांच्या घटस्फोटाच्या चर्चांना उधाण आलं होतं. याचदरम्यान, अभिषेकचं नाव 'दसवीं'मधील त्याची सहकलाकार निम्रत कौरशी जोडलं गेलं होतं. निम्रतमुळे या दोघांच्या नात्यात दुरावा आल्याचं म्हटलं गेलं. त्यासाठी निम्रतला खूप ट्रोल करण्यात आलं होतं. त्यामुळेच आता ट्रोलर्सनी तिची माफी मागायला हवी, अशा कमेंट्स चाहत्यांनी ऐश्वर्याच्या पोस्टवर केल्या आहेत.

## अभिनेत्री इशिका तनेजाचा ग्लॅमरविश्वाला अलविदा

प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यातील अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर चर्चेत आहेत. अनेक सेलिब्रिटी त्रिवेणी संगममध्ये स्नान करण्यासाठी महाकुंभमेळ्यात जात आहेत. अभिनेत्री ममता कुलकर्णीने तर महाकुंभमेळ्यात संन्यास घेतला. आता आणखी एका अभिनेत्रीने इथेच दीक्षा घेतल्याची माहिती समोर आली आहे. 'इंदू सरकार' फेम ३० वर्षीय अभिनेत्री इशिका तनेजाने ग्लॅमरविश्वाला अलविदा केलं आहे.

इशिका तनेजाने लंडनमधून शिक्षण घेतलंय, ती मिस वर्ल्ड टुरिझम राहिली आहे. पण आता तिने अध्यात्माची वाट निवडली आहे. इशिका आता सनातन धर्माचा प्रचार व प्रसार करत आहे. इशिका तनेजाने द्वारका-शारदा पीठचे शंकराचार्य सदानंद सरस्वती यांच्याकडून गुरू दीक्षा घेतली आहे. प्रसिद्धी आणि नाव कमावल्यानंतरही आयुष्यात काहीतरी कमी आहे, असं वाटत होतं. आयुष्यात सुख व शांती खूप महत्त्वाची आहे, त्याशिवाय आयुष्य सुंदर नाही, असं इशिकाने सांगितलं. इशिका तनेजा म्हणाली, "मी साध्वी नाही, मी सनातनी आहे. महाकुंभात दैवी शक्ती आहेत. माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी कामगिरी म्हणजे मला शंकराचार्यजींकडून गुरु दीक्षा मिळाली आहे. गुरू मिळाल्याने जीवनाला दिशा मिळते. इशिका पुढे म्हणाली, की माझा प्रवास खूप वेगळा राहिला आहे. मला गिनीज बुकचा पुरस्कार मिळाला होता. मी मिस वर्ल्ड टुरिझम राहिले. भट्ट साहेबांबरोबर



सीरिज केली. टी-सिरीजची अनेक गाणी केली, पण मी योग्य वेळी माघारी परतले. स्त्रिया लहान कपडे घालून नाचायला बनलेल्या नाहीत. त्या सनातनच्या सेवेसाठी बनलेल्या आहेत. टीआरपी वाढवण्यासाठी महाकुंभला आली आहे का? आणि यानंतर ती पुन्हा तिच्या शोबिज दुनियेत जाईल का? असं विचारल्यावर इशिका तनेजा म्हणाली, माझा प्रवास खूप पूर्वीपासून सुरू झाला होता. मी आर्ट ऑफ लिव्हिंगचा देखील एक भाग राहिले आहे. इशिकाने आयआयटी बाबा आणि हर्षाबद्दल वक्तव्य केलं. त्यांचा हेतू बघावा, विचार पाहावे, विकारांकडे पाहू नये. ते सगळे सनातनचा प्रचार करत असेल तर अडचण काय आहे?

### जुन्या लूकमध्ये परत जाणार का इशिका?

दीक्षा घेतल्यानंतर इशिकाच्या सोशल मीडियावर तिचे भगव्या कपड्यांमधील फोटो पाहायला मिळत आहेत. त्यामुळे पुढील ६ महिन्यांनंतरही तिच्या सोशल मीडिया प्रोफाइलवर हाच लूक दिसणार का? असं तिला विचारण्यात आलं. ती म्हणाली, मी पुन्हा कधीच जुन्या लूकमध्ये दिसणार नाही. जर मला चित्रपट निर्मितीची संधी मिळाली तर मी ते नक्कीच करेन, पण त्यातही सनातनचाच प्रचार करेन. सनातनमध्ये फॅशनच्या आवश्यकतेबद्दल इशिका म्हणाली, तुम्ही फॅशनेबल पद्धतीने भगवे कपडे परिधान केले नाही तर ते कसे दिसतील? भगवे कपडे घालणं ही अभिमानाची बाब आहे, तरुणींनी सुंदर पद्धतीने भगव्या साड्या नेसल्या, तरच प्रचार होईल. सनातन फॅशनेबल असायला पाहिजे आणि सनातन सत्तेतही असायला पाहिजे. निवडणूक लढवण्याबाबत इशिका तनेजा म्हणाली की तिच्या राजकीय महत्त्वाकांक्षा नाहीत. तसेच ती बिग बॉसमध्ये जाणार नसल्याचे तिने स्पष्ट केले. यापूर्वीही फोन आले होते, पण आपण बिग बॉसच्या ऑफर नाकारल्याचं तिने सांगितलं.

## लग्नानंतर शिल्पा शिरोडकरने केले होते सलूनमध्ये काम

बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शिरोडकर बिग बॉसच्या १८ व्या सीजनमध्ये सहभागी झाली होती. १०२ दिवस ती या घरात होती. मात्र, खेळाच्या अगदी शेवटच्या टप्प्यात अभिनेत्रीला घराबाहेर जावे लागले. बिग बॉसचा सीजन संपल्यानंतरही अभिनेत्री विविध मुलाखतींमध्ये केलेल्या वक्तव्यामुळे मोठी चर्चेत आहे. एका मुलाखतीत शिल्पा शिरोडकरने लग्नानंतर सलूनमध्ये काम केले होते, असा खुलासा केला आहे.

अभिनेत्री शिल्पा शिरोडकरने लग्नानंतर तिचे आयुष्य कसे होते, याबद्दल सांगितले. शिल्पा म्हणाली, की लग्नानंतर मी माझ्या पतीसह एक वर्ष नेदरलँडला राहत होते. त्यावेळी तो शिक्षण घेत होता. आमचे अरेंज मॅरेज होते. एक वर्ष नेदरलँडमध्ये राहिल्यानंतर आम्ही न्यूझीलंडमध्ये स्थायिक झालो. त्यानंतर मी हेअर ड्रेसिंगचा कोर्स केला. सलूनमध्ये काम केले. कारण मला घरी राहायचे नव्हते. आठवड्याच्या शेवटी म्हणजेच वीकेंडला सलूनमध्ये क्लायंट्सची गर्दी असायची. त्यामुळे खूप काम असायचे. सुरुवातीला मी इंटर्न म्हणून काम करीत होते. त्यामुळे पडलेले केस काढणे, वापरलेले टॉवेल स्वच्छ करणे अशी कामे मला करायला लागायची. माझा नवरा बँकेत कामाला होता. त्याला वीकेंडला सुट्टी असायची. मी मात्र काम जास्त असल्याने त्याच दिवशी व्यस्त असायचे. आम्हाला एकत्रित वेळ मिळत नव्हता. त्यामुळे मी ते काम सोडलं. त्यानंतर मी एका कंपनीत क्रेडिट कंट्रोलर म्हणून दीड वर्ष काम केलं, असं ती म्हणाली.

## विक्की अन् कतरिनाची पहिली भेट कशी अन् कुठे झाली...

**बॉलीवूड अभिनेता विक्की कौशल लवकरच त्याच्या आगामी ऐतिहासिक 'छावा' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सध्या तो या चित्रपटाच्या प्रमोशनच्या कामात व्यस्त आहे. प्रमोशननिमित्त तो अनेक माध्यमांना मुलाखती देत आहे. अशात एका मुलाखतीमध्ये विक्कीने त्याच्या आणि कतरिना कैफच्या लव्ह स्टोरीबद्दलची खास आठवण सांगितली आहे.**

बॉलीवूडमधील कलाकार आणि त्यांच्या प्रेमकहाण्या जास्त काळ लपून राहत नाहीत. मात्र, विकी आणि कतरिना या दोघांनी त्यांच्या नात्याची कुणाला कल्पनादेखील येऊ दिली नाही. २०२१ मध्ये थेट पती- पत्नी म्हणून एकमेकांचा स्वीकार केल्यावर त्यांनी त्यांचं नातं जाहीर केलं. त्यावेळी चाहत्यांना फार मोठा सुखद धक्का बसला होता. अशात या दोघांच्या लव्ह स्टोरीबद्दल जाणून घेण्यासाठी चाहते नेहमीच उत्सुक असतात. मात्र, दोघांची लव्ह स्टोरी ही अद्यापही एक मोठं रहस्य आहे. विक्की कौशलनं नुकतीच 'छावा' चित्रपटाच्या प्रमोशननिमित्त एका वृत्त संकेतस्थळाला मुलाखत दिली. त्यावेळी त्याने कतरिना त्याला पहिल्यांदा केव्हा, कशी व कुठे भेटली होती त्याची आठवण सांगितली आहे. विक्की कौशल आणि कार्तिक आर्यन एका कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करत होते. त्यावेळी तेथे मंचावर कतरिना कैफबरोबर त्याने तिच्या अनेक गाण्यांवर डान्स केला होता. मुलाखतीत त्या वेळची आठवण सांगताना विक्की म्हणाला, इथे पहिल्यांदाच मी तिला भेटलो आणि



माझी तिच्याशी ओळख झाली. तसं तर या कार्यक्रमात सूत्रसंचालन करताना कानाला एक मशीन आणि माईक लावलेला असतो. त्यातून सतत काय करायचे आहे, काय नाही याच्या सूचना दिल्या जातात. त्या सर्व सूचना माझ्या कानावर येत होत्या आणि त्याच वेळी माझी तिच्याशी पहिल्यांदाच ओळख झाली होती. त्यावेळी तू थोडा चिंतेत होतास का, असा प्रश्न विक्कीला मुलाखतीत पुढे विचारण्यात आला. त्यावर त्यानं पटकन नाही, असं उत्तर दिलं. मी चिंतेत नव्हतो; पण खरं सांगायचं तर तेव्हा ती मला ओळखत आहे की नाही हे मला माहीत नव्हतं. पण, खरंच ती खूप गोड दिसत होती, असं विक्कीनं या मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. विक्की आणि कतरिना कैफ या दोघांच्या लव्ह स्टोरीबद्दल जाणून घेण्यासाठी चाहते नेहमीच उत्सुक असतात. आता विक्कीनं सांगितलेला त्यांच्या पहिल्या भेटीचा हा किस्सा सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. विक्की व कतरिना यांच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास, सध्या विक्कीच्या आगामी 'छावा' चित्रपटाची सर्वत्र चर्चा होत आहे. हा चित्रपट १४ फेब्रुवारीला प्रदर्शित होत आहे. त्यात विक्कीबरोबर रश्मिका मंदाना मुख्य भूमिका साकारत आहे. कतरिना कैफच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती शेवटची 'मेरी ख्रिसमस' या तमीळ चित्रपटात दिसली होती. त्याआधी बॉलीवूडच्या 'टायगर ३'मध्ये कतरिनाचा अभिनय पाहायला मिळाला.

## शॉर्ट न्यूज

### शॉर्टसर्किटमुळे डाळिंब बाग खाक

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील कोळगाव येथील शेतकरी जयवंत लगड यांच्या पाच एकर शेतामधील ५०० डाळिंबाची झाडे विद्युत वाहिनीची तार तुटल्याने लागलेल्या आगीत जळून खाक झाली. मध्यरात्री एक वाजता लगड यांच्या गट नंबर ७१९ मधून गेलेल्या मुख्य विद्युत वाहिनीची तार तुटून आग लागली. आगीत चार वर्षांपूर्वी लावलेल्या व पूर्ण वाढ झालेल्या ५०० डाळिंबाच्या झाडांना आग लागून त्या जळून खाक झाल्या. त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीची भरपाई संबंधित विभागाने द्यावी, अशी मागणी शेतकरी जयवंत लगड यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### बाजार समितीत कांद्याला ३५०० रुपये भाव

■ **राहाता :** बाजार समितीत कांद्याला जास्तीत जास्त ३५०० रुपये भाव मिळाला. कांद्याच्या १९३८ गोण्यांची आवक झाली. कांदा नंबर १ ला २८०० ते ३५०० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर २ ला १८०० ते २७५० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर ३ ला ९०० ते १७५० रुपये भाव मिळाला. गोल्टी कांद्याला २००० ते २५०० रुपये भाव मिळाला. जोड कांद्याला ५०० ते १००० रुपये भाव मिळाला. डाळिंबाच्या २६ कॅरेटची आवक झाली. डाळिंबाला सरासरी २५० रुपये भाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

### बिबट्याचा हल्ला निष्काळजीपणामुळे

■ **राहुरी :** तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांवर बिबट्यांचे हल्ले वाढल्याने वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाचे गंभीर आरोप झाले आहेत. भगवा ग्रुपचे महाराष्ट्र अध्यक्ष निलेश जगधने यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे यासंदर्भात तक्रार दाखल केली आहे. राहुरी तालुक्यातील वनविभागातील सावळा गोंधळाबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच अधिकारी आणि वृक्षतोड करणाऱ्या वखार मालकांमधील संबंधांबाबत चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### युथोत्सवातून २०१९ विद्यार्थ्यांना नोकरी

■ **संगमनेर :** युवकांनी जगामध्ये कुठेही जाण्याची तयारी ठेवणे गरजेचे असून युथोत्सव नोकरी मेळावा तरुणांसाठी रोजगाराची मोठी संधी ठरणार असल्याचे प्रतिपादन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयात आय लव संगमनेर लोकचळवळीच्या वतीने आयोजित युथोत्सव नोकरी मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते. यामध्ये संगमनेर तालुक्यासह ७२९० युवक व युवतींनी सहभाग नोंदवला. विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधून २०१९ विद्यार्थ्यांची थेट निवड झाली.

### वाळूतस्करांवर कारवाईचा बडगा

■ **अकोले :** अवैधरित्या होणाऱ्या वाळू उपशावर कारवाईसाठी गेलेल्या महसूलच्या पथकावर अंभोरे शिवारात जेसीबी घालून जीवे मारण्याचा प्रकार घडला होता. यानंतर प्रशासनाने कडक पावले उचलली असून, दंडात्मक कारवाईच्या नोटिसा, सातबाऱ्यावर बोजा चढवून शासनाचे नाव लावणे, बँक खाते सील करणे, जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव आदी कठोर कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. यामुळे संगमनेर तालुक्यातील वाळूतस्करांचे धाबे दणाणले आहे. गावोगावचे कामगार तलाठी, कोतवाल, मंडल अधिकारी यांना सतर्क राहण्याच्या सूचनाही देण्यात आलेल्या आहे.

# झारखंडमध्ये मराठी ठसा!

■ खंडाळे गावचे सुपुत्र राहुल नळकांडे यांना सुवर्णपदक
■ रांची येथे ६८ वा अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळावा

**शिरुर : सतीश डोंगरे**

**झारखंडमधील रांची येथे पार पडलेल्या ६८ व्या अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळाव्यात महाराष्ट्र टीमच्या वतीने शिरुर तालुक्यातील खंडाळे गावचे सुपुत्र व सातपूर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक राहुल नळकांडे यांनी गोल्ड मेडल पटकाविले. झारखंड सीआयडीच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या हस्ते यावेळी त्यांचा गौरव करण्यात आला.**



१० ते १५ फेब्रुवारी दरम्यान झारखंडमधील रांची येथे ६८ व्या अखिल भारतीय पोलिस ड्युटी मीट २०२४-२५ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी घेण्यात आलेल्या सायंटिफिक एडस् टू इन्व्हेस्टिगेशन या स्पर्धेत महाराष्ट्राच्या वतीने सातपूर ( नाशिक) पोलीस ठाण्याचा संघ सहभागी झाला होता. यामध्ये वैयक्तिक प्रकारात सातपूर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक राहुल नळकांडे यांनी गोल्ड मेडल पटकाविले.

खंडाळे (ता. शिरूर) गावचे सुपुत्र राहुल नळकांडे सध्या सातपूर ( नाशिक) पोलीस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. शेतकरी कुटुंबातील राहुल नळकांडे यांचे प्राथमिक शिक्षण खंडाळे गावात तर माध्यमिक शिक्षण शिरूरच्या विद्याधाम प्रशालेत झाले. त्यानंतर त्यांनी पुण्याच्या कृषी महाविद्यालयातून बीएस्सी ॲग्री पूर्ण केले. २०१४-१५ मध्ये त्यांची एमपीएससी मधून पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली. सुरुवातीला पुण्यात त्यानंतर ठाणे येथे तर सध्या सातपूर येथील पोलीस ठाण्यात ते पोलिस उपनिरीक्षक म्हणून सेवेत आहेत.त्यांना मिळालेल्या गोल्ड मेडलबद्दल शिरूर तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### सुवर्णपदक मिळाले याचा आनंद !

**१० ते १५ फेब्रुवारी दरम्यान झारखंडमधील रांची येथे ६८ व्या अखिल भारतीय पोलिस ड्युटी मीट २०२४-२५ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी घेण्यात आलेल्या सायंटिफिक एडस् टू इन्व्हेस्टिगेशन या स्पर्धेत महाराष्ट्राच्या वतीने आमचा सातपूर ( नाशिक) पोलीस ठाण्याचा संघ सहभागी झाला होता. यामध्ये वैयक्तिक प्रकारात मला सुवर्णपदक मिळाले याचा आनंद वाटतो. सायंटिफिक एडस् टू इन्व्हेस्टिगेशन म्हणजेच गुन्हा शोधण्यासाठी न्यायवैद्यक शास्त्राच्या (फोरेन्सिक सायन्स) विविध शास्त्रीय साहाय्यांचा वापर केला जातो.या शास्त्राच्या मदतीने गुन्हेगारांना ओळखले जाते, गुन्ह्याची वेळ आणि परिस्थिती समजली जाते आणि गुन्हा सिद्ध करण्यास मदत होते.**

**राहुल नळकांडे**
**पोलीस उपनिरीक्षक, सातपूर**

# प्रेम अमेरिकेत अन् लग्न शिर्डीत!

■ वधू पक्षाला भावली मराठी संस्कृती
■ हिंदू पद्धतीने जुळवल्या रेशीम गाठी

**शिर्डी : प्रतिनिधी**

**जगातील अनेक देशातील नागरिकांना भारतीय संस्कृतीची भुरळ नेहमी पडत असते. त्यामुळे अनेकजण याचा अवलंबही करतात. व्हिएतनाम येथील एक तरुणीही लोणीतील तरुणाच्या प्रेमात पडली. त्याच्यासोबत वेळ घालवताना तिला मराठी संस्कृती इतकी भावली की, तिने मराठी तरुणाशी विवाह करण्याचा निर्णय घेतला. दोघांनीही एकमेकांच्या कुटुंबीयांना तयार केले. दोन्हीकडील पाहुण्यांनी रितीरिवाज पाहून दोघांचे लग्न लावून देण्याचा निर्णय घेतला. अखेर दोघांच्या रेशीमगाठी शिर्डीतील एका खासगी हॉटेलमध्ये थाटामाटात बांधल्या गेल्या.**



वर मूळचा लोणी (जि. अहिल्यानगर) येथील असून वराचे आजोबा निवृत्त मुख्याध्यापक तर वडील सार्वजनिक बांधकाम विभागात इंजीनिअर आहेत. मुलाने परदेशात एमएस केले. वधू मूळची व्हिएतनामची असून, तिने एमबीए फायनान्स पूर्ण केले. सध्या दोघेही अमेरिकेतील वॉशिंग्टनमध्ये ॲमेझॉन या नामांकित कंपनीत उच्च पदावर कार्यरत आहेत. एकाच कंपनीत काम करत असताना त्यांची ओळख झाली आणि हळूहळू मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. काही वर्षांच्या नात्यानंतर त्यांनी लग्नाचा निर्णय घेतला. सात फेऱ्यांसह विधीवत लग्न पार पडले. भारतीय पद्धतीने मंगलाष्टके, सप्तपदी आणि अन्य परंपरागत विधी पार पाडण्यात आले. मराठी रितीरिवाज पाहून व्हिएतनामचे वऱ्हाडी भारावून गेले. दरम्यान, विवाह सोहळ्यानंतर नवविवाहित दांपत्य पुन्हा अमेरिकेत परतणार आहे. तिथे आपल्या करिअरसोबत नव्या आयुष्याची सुरुवात करणार आहे. विवाहानंतर नवदाम्पत्यावर फुलांचा वर्षाव करण्यात आला.

**आई-वडिलांची संमती आणि लग्नाची तयारी**

जेव्हा दोघांनी हा निर्णय आपल्या कुटुंबीयांना सांगितला, तेव्हा दोन्ही बाजूच्या पालकांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. वधूपक्ष व्हिएतनामचा असल्याने सुरुवातीला थोडा संभ्रम होता. मात्र, दोन्ही कुटुंबीयांनी एकमेकांच्या घरी भेटीगाठी घेत, चर्चा करून, विवाहासाठी मान्यता दिली. मुलीच्या आईवडिलांना व्हिएतनामचीच भाषा समजत असल्याने वधू वरच दोन्ही बाजूने दुभाषकाची भूमिका पार पाडत होते.

**ही संस्कृती माझ्या आयुष्याचा भाग बनली**

भारतीय संस्कृतीच्या रंगांनी आणि परंपरांनी माझे हृदय जिंकले. व्हिएतनाममध्ये छोटेखानी विवाह होतो, पण भारतातील लग्नाच्या समारंभातील पारंपरिकता, आनंद आणि उर्जेने मला भारावून टाकले. ही संस्कृती आता माझ्या आयुष्याचा एक सुंदर भाग बनली आहे.
आभा (न्हू) वधू, व्हिएतनाम.

# शिरूर नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापनाचे १५ दिवसांत नियोजन करावे

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा कारवाईचा इशारा | कचरा डेपो मुळे शिरुरच्या नागरीकांचे आरोग्य धोक्यात

**शिरुर : प्रतिनिधी**

**शिरूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापनातील गंभीर त्रुटींवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कडक भूमिका घेतली आहे. शहरातील वायू प्रदूषणाच्या वाढत्या तक्रारींमुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाने नगरपरिषदेवर कठोर निर्देश जारी केले असून, १५ दिवसांत उपाययोजना न केल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.**




मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष महिबुब सय्यद, शिरूर प्रवासी संघाचे अध्यक्ष अनिल बांडे, मनसेचे शिरूर तालुका संघटक अविनाश घोगरे, मनसेचे शहराध्यक्ष आदित्य मैड व मनसेचे सचिव रवि लेंडे यांनी २७ जानेवारी २०२५ रोजी शिरुरच्या कचरा डेपो संदर्भात प्रदूषणाच्या तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर २८ जानेवारी २०२५ रोजी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता नियमांचा भंग होत असल्याचे समोर आले.
कचऱ्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन नाही,अवैज्ञानिक पद्धतीने कचरा टाकला जात आहे, काही ठिकाणी घनकचऱ्याचे जाळणे सुरूच असून वायू प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याची नोंद प्रदूषण नियंत्रण मंडळाने घेतली आहे. याबाबत १५ दिवसांत उपाययोजना न केल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा नगरपालिकेला देण्यात आला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी जे. एस. साळुंखे यांनी १५ दिवसांची अंतीम मुदत दिली आहे. या कालावधीत नगरपरिषदेकडून योग्य घनकचरा व्यवस्थापन प्रणाली राबवली नाही तर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ आणि हवेचे प्रदूषण प्रतिबंधक कायदा १९८१ अंतर्गत कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. शहरातील वाढत्या प्रदूषणामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे, स्थानिक प्रशासनाची उदासीनता आणि नियमांकडे केलेले दुर्लक्ष यातून संपूर्ण राज्यासाठी धोक्याची घंटा आहे. संदर्भात आज मनसेच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन माहिती देण्यात आली.

## वाचकांच्या लेखणीतून

# मिर्ज़ा ग़ालिबचा अंदाज़े बयां

तुम न आए तो क्या सहर न हुई।
हां मगर चैन से बसर न हुई।।
मिर्ज़ा ग़ालिब म्हणतो, तू नाही आलीस म्हणून सकाळ व्हायची थोडीच थांबली आहे? हां; पण (रातभर मी) बेचैनच होतो!



मिर्ज़ा असदुल्लाह बेग ख़ान ऊर्फ ग़ालिब (१७९७-१८६९) हा उर्दू भाषेतील नुसता शायरच नव्हता; तर आदर्श उर्दू पत्रसाहित्याचा पाया घालणारा लेखकही होता. हे फार थोड्या लोकांना माहिती असेल. २००२ साली मिर्ज़ा ग़ालिबवर नाशिकच्या गावकरी दैनिकात ग़म खाते खाते मूंह का मज़ा तक बिगड़ गया मथळ्याचा माझा एक लेखही प्रकाशित झाला होता. त्यात मी मिर्ज़ा ग़ालिबच्या या वैशिष्ट्याचा आवर्जून उल्लेख केला होता. ग़ालिब हा बहादुरशाह ज़फ़र याचा दरबारी शायर (राजकवी) होता.बादशाहने त्याला दबीर-उल्मुल्क आणि नज़्म-उद्दौला या पदव्या बहाल केल्या होत्या.इब्राहीम ज़ौक़ हा महान उर्दू शायर ग़ालिबचा समकालीन होता. सूफ़ी पंथ हा सनातनी इस्लामविरुध्द धार्मिक विद्रोह किंवा बंड होते. उर्दू शायरी सुफ़ी वळणावरच गेलेली आहे. मिर्ज़ा ग़ालिब हाही त्याला अपवाद नव्हता. इस्लाममधील कट्टर सनातन तत्त्वांविरुध्द त्याचे क्रांतीकारक विचार आढळात येतात. तो म्हणतो,

तेरी दुआओं में असर हो तो
मस्जिद को हिला के दिखा।
नहीं तो दो घूंट पी और
मस्जिद को हिलता देख।।

पुजाऱ्याला (मुल्लाला) ग़ालिब म्हणतो, हे पुजाऱ्या, तुझ्या दुवा देण्यात काही प्रभाव असला तर मशीद हलवून दाखव. नाही तर दोन घोट (दारू) पिऊन बघ. मशीद हलताना दिसेल!

मसनवी, कसीदा, ग़ज़ल, पत्रलेखन आदी उर्दूफ़ारसी साहित्यप्रकारांत त्याने लीलया संचार केलेला आहे. दीवान-ए-ग़ालिब हा त्याचा ग़ज़लसंग्रह प्रसिध्दच आहे. त्याच्या लेखनात नाज़ुकख़याली, उच्च तत्त्वचिंतन सापडते.

ग़ालिब आयुष्यभर भाड्याच्याच घरात राहिला. त्या ख़स्ताहाल घरांचे वर्णन करताना तो म्हणतो,

उग रहा है दरो दीवार पै सब्जा ग़ालिब।
हम बयाबां हैं और घर में बहार आई है।।

घराच्या भिंती आणि वरंडीवर गवत उगवले आहे. आम्ही वाळवंटात आहोत आणि घरात वसंत ऋतू आला आहे;
आपल्या पत्रात तो कळवितो, अब्र दो घंटे बरसे तो छत चार घंटे बरसती है! (ढग दोन घंटे बरसतो आणि छत चार घंटे टपकते!)

मेरी किस्मत में ग़म अगर इतना था।
दिल भी यारब कई दिए होते।।

है ईश्वरा, माझ्या नशिबात इतकी दुःखे होती तर (ती सहन करण्यासाठी) तितकी काळजे तरी मला द्यायची होतीस!

हैं और भी सुख़नवर दुनिया में बहुत अच्छे ।
कहते हैं कि ग़ालिब का है अंदाज़-ए-बयां और।।

दुनियेत अनेक साहित्यिक असतील; पण ग़ालिबची वर्णनशैली काही वेगळीच! ही ग़ालिबची बढाई नव्हती. ते वास्तवच होते. असे म्हणण्यास हरकत नाही.

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# खंडणीखोर गँगचा नायनाट झाला पाहिजे

**अन्यथा राज्यात उद्रेक होईल**
**मनोज जरांगे पाटील यांचा इशारा**

**हिंगोली : प्रतिनिधी**

**मस्साजोग प्रकरणातील खंडणीखोर गँगचा नायनाट झालाच पाहिजे अन्यथा राज्यात उद्रेक झाल्या शिवाय राहणार नाही कारण लोकांची सहनशीलता संपू शकते असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी आजेगाव (ता. सेनगाव) येथे पत्रकारांशी बोलतांना दिला आहे.**

सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमासाठी आल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी बोलतांना जरांगे पाटील म्हणाले की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील एक आरोपी पकडण्यासाठी दोन ते अडीच महिने कशाला लागतात. आरोपींना सांभाळणाऱ्यांना तसेच खंडणी मागणाऱ्यांना सांभाळणाऱ्यांवर सह आरोपी म्हणून गुन्हे का दाखल झाले नाही, पोलिसांवर कारवाई का झाली नाही असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या प्रकरणात ॲड. उज्वल निकम यांची अद्यापही नियुक्ती केली नाही त्यामुळे दोषारोपपत्र कसे होणार, न्याय कधी मिळणार याबाबत संशय येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पोलिसांची सोबत असल्या शिवाय खून प्रकरण होऊ शकत नाही, पोलिसांपासून ते खंडणी मागणाऱ्यांनी सरपंच संतोष देशमुख यांचा खून केला आहे. या प्रकरणातील आरोपींना फाशीच झाली पाहिजे त्यांना मदत करणाऱ्यांना सह आरोपी केले पाहिजे हि आमची सुरवातीपासूनची मागणी आहे. या सोबतच या गँगचा देखील नायनाट झाला पाहिजे. आता लोकांची सहनशीलता संपून राज्यात कधीही संतापाचा उद्रेक होईल असा इशाराही त्यांनी दिला.

(पान १ वरून)

### पुण्यात अवतरली शिवशाही!

श्रीमंत खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, सहकार आणि नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. तर भारताच्या इतिहासातील शिवकालीन युध्दकला सादर करणाऱ्या ५१ रणरागिणींच्या शौर्य पथकाने मर्दानी युध्दकला सादर केली. नादब्रह्म ढोल ताशा पथकाच्या जल्लोषपूर्ण वादनाने वातावरण मंत्रमुग्ध झाले.

### सहाय्यक लेखाधिकारी अटकेत!

यासंदर्भात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पथकाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक छाया देवरे, अंमलदार सचिन सुद्रुक, गजानन गायकवाड यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### शिवबांच्या जन्मोत्सवाला गालबोट

त्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या हेमंत सोनवणे यास तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. हेमंत सोनवणे हा गंभीर जखमी असल्याने त्यास जळगाव येथे उपचारार्थ हलविण्यात आले. दरम्यान, हेमंत सोनवणे याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणातील आरोपी असलेला रोहीत लोणारी याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.
हत्येचं कारण अद्याप अस्पष्ट
या घटनेप्रकरणी पाचोरा पोलीस स्टेशनमध्ये रोहित लोणारी याच्या विरुध्द खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला असुन या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अशोक पवार हे करीत आहे. रोहित लोणारी याने हेमंत सोनवणे याचा खुन का केला, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. मात्र, या घटनेने जळगावात मात्र एकच खळबळ माजली आहे.

# किसानच्या मिरवणूकीने वेधले पारनेकरांचे लक्ष!

## शिवबाच्या गगनभेदी जयघोषाने दुमदुमली नगरी

**पारनेर : प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त किसान इंटरनॅशल स्कुलच्या वतीने शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणूकीने पारनेरकरांचे लक्ष वेधले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गगनभेदी जयघोषाने अवघी पारनेर नगरी दुममुमली होती. भगवे फेटे आणि हाती भगवे ध्वज घेऊन सहभागी झालेले किसानचे विद्यार्थी लक्ष वेधून घेत होते.**

सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ऋषिकेश हॉटेलजवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे किसानचे सर्वेसर्वा तथा माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे यांच्या हस्ते पुजन करण्यात आल्यानंतर मिरवणूकीला सुरूवात झाली. मिरवणूकीपूर्वी ध्वनीक्षेपकावर लावण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाडयांमुळे परिसर शिवमय झाला होता.

चंद्रकांत चेडे यांनी छत्रपतींच्या पुतळयाचे पुजन केल्यानंतर गगनभेदी घोषणा देत मोठया उत्साहात मिरवणूकीला प्रारंभ झाला. मिरवणूकीत चंद्रकांत चेडे यांच्यासह प्राचार्य मनोज राठोर, संतोष गाढवे, युवा उद्योजक ऋषिकेश चेडे, किशोर शहाणे,किसान स्कुलचे सर्व शिक्षक, विद्यार्थी तसेच शहरातील शिवप्रेमी ग्रामस्थ सहभागी झाले होते.



### छत्रपतींच्या कार्याचा गौरव

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या शौर्याचे प्रतिक आहेत. या मातीत जन्मलेल्या प्रत्येकासाठी छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ नाव नसून शौर्य, समता, प्रेरणा आणि आस्थेचे केंद्र आहे. स्वराज्य स्थापनेपासून आजपर्यंत महाराष्ट्राचे राजकारण आणि सत्ता छत्रपती शिवाजी महाराजांभोवतीच फिरताना दिसते.हाच छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव आहे.

**चंद्रकांत चेडे**
संस्थापक, किसान स्कुल

### किसानचे पथक ठरले आकर्षण

या मिरवणूकीत क्रीडा शिक्षक ऋषिकेश औटी यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी झालेले झांज पथक, लेझिम पथक व ढोल पथक मिरवणूकीचे आकर्षण ठरले. लयबध्द पध्दतीने विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध प्रकारांनी उपस्थितांना खिळून ठेवले होते. मिरवणूकीमध्ये सहभागी अश्वही लक्षवेधी ठरला.

### संस्मरणीय मिरवणूक

किसान शैक्षणिक संकुलामध्ये विविध सामाजिक उपक्रम विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देण्यात येते. महाराष्ट्राचे अराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीची तयारी सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये पहावयास मिळालेला उत्साह त्यांना महाराजांविषयी असलेल्या प्रचंड अस्थेचा प्रत्यय देऊन गेला. त्याच उत्साहात किसानचे विद्याथ मिरवणूकीत सहभागी झाले. एक संस्मरणीय मिरवणूक सोहळा पारनेरकरांना अनुभवण्यास मिळाला.

**ऋषिकेश चेडे**
युवा उद्योजक

# रांध्यामध्ये ४६ घरकुलांना मंजुरी

## लाभार्थ्यांच्या बैठकीत सरपंचांचे मार्गदर्शन

**रांधे : प्रतिनिधी**

**रांधे गावामध्ये ४६ गरजू लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुले मंजुर झाल्याची माहिती सरपंच संतोष काटे यांनी दिली. सर्व लाभार्थ्यांची बैठक घेऊन घरकुल बांधण्यासाठीची जागा तसेच तांत्रीक अडचणी समजून घेत लवकरात लवकर बांधकाम सुरू करण्यासंदर्भात सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही देण्यात आल्याचे काटे म्हणाले.**

काटे म्हणाले, सन २०१६ मध्ये पंतप्रधान आवास योजनेचा शुभारंभ झाला. त्याच वेळी गावातील लाभार्थ्यांची घरकुल ड यादी तयार करण्यात आली होती. प्रत्यक्ष या योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय झाल्यानंतर ही यादी पंचायत समितीकडे पाठविण्यात आली. या यादीची पडताळणी होऊन पंचायत समितीने ४६ घरकुलांना मंजुरी दिली आहे. आर्थिक दृष्टया दुर्बल, कमी उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गटातील कुटूंबांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. या योजनेसाठी सन २०१६ मध्ये ज्या लाभार्थ्यांनी मागणी केली त्यांची घरकुल ड यादीत समावेश करण्यात आला होता असे सरपंच संतोष काटे यांनी सांगितले.



### मनस्वी आनंद

पंतप्रधान आवास योजनेचा शुभारंभ सन २०१६ मध्ये झाला. त्याच वेळी शासन निर्णयाप्रमाणे ग्रामसभा घेण्यात येऊन घरकुल ड यादी तयार करण्यात आली होती. सन २०१६ मध्ये मी गावचा उपसरपंच होतो. आज ड यादीमधील ४६ कुटूंबांना घरकुले मिळत आहे याचा मनस्वी आनंद होतो आहे.

**संतोष काटे**, सरपंच, रांधे

मंगळवारी पार पडलेल्या लाभार्थ्यांच्या बैठकीत लाभार्थ्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला गेला. तांत्रीक अडचणी समजावून घेऊन या घरकुलांची कामे लवकरात लवकर कशी सुरू होतील यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे काटे यांनी सांगितले. बैठकीस ग्रामसेवक भालेकर, माजी सरपंच दिलीप आवारी, बाळासाहेब आवारी, रामदास भोसले, विनोद फापाळे, शकिर तांबोळी, रामदास शेटे, प्रमोद गायकवाड, अमोल शिंदे आदी उपस्थित होते.

# मळगंगा ट्रस्टच्या वतीने उत्तीर्णांचा सत्कार

## अभ्यासिकेच्या सहा विद्यार्थ्यांचे एमपीएससी परीक्षेत यश



**निघोज : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये निघोज येथील शरदचंद्र पवार अभ्यासिकेतील सहा विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वास शेटे, विस्वस्त ठकाराम लंके, अनिल शेटे, बबन ससाणे, ॲड. बाळासाहेब लामखडे, रोहिदास लामखडे, रूपेश ढवण यांनी यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशामध्ये आपल्या आई-वडीलांचा मोठा वाटा असल्याचे आवर्जुन सांगितले. निघोज येथे सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिकेचा फायदा अभ्यासासाठी झाल्याचे काही परीक्षाथनी सांगितले. वेळेचे नियोजन, अभ्यासात सातत्य व कठोर परिश्रम करण्याची जिद्द बाळगली तर यश दुर नाही असे सांगतानाच केवळ या पदावर न थांबता यापुढील काळातही अभ्यास सुरू ठेऊन राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांची तयारी करण्यात आम्हाला स्वारस्य असल्याचेही यशस्वी विद्यार्थ्यांनी सांगितले. राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये पारनेर तालुक्यातील उत्तीर्णांचा टक्का नेहमीच मोठा असतो. यापुढील काळातही तो अधिकच असेल असा विश्वासही या विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

### हे आहेत यशस्वी विद्यार्थी

स्वप्निल संतोष सालके जवळे, सुनील दादाभाऊ सालके जवळे, सचिन बाळासाहेब पवळे जवळे, प्राजक्ता हिराभाऊ तांबे वडगांव गुंड, बाबुराव नामदेव कारखिले गुणोरे यांची महसुल सहाय्यक म्हणून तर शिरापुर येथील सागर कैलास नरसाळे याची मुंबई पोलीसमध्ये निवड झाल्याबद्दल मळगंगा ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# महावितरणच्या कार्यालयात शेतकऱ्यांचे आंदोलन

## सुरळीत वीज पुरवठा करण्याची मागणी । गुणोरे-गाडीलगांवचे शेतकरी आक्रमक



**गाडीलगांव : प्रतिनिधी**

**गुणोरे-गाडीलगांव परिसरात सुरळीत व पुर्ण दाबाने वीज पुरवठा करण्याच्या मागणीसाठी तेथील शेतकऱ्यांनी सोमवारी महावितरणच्या पारनेर येथील कार्यालयात आंदोलन केले. सुरळीत व पुर्ण दाबाने वीज पुरवठा करण्याचे अश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.**

ग्रुप ग्रामपंचायत गुणोरे-गाडीलगांव या परिसरात मागील चार वर्षांपासून फेब्रुवारी ते एप्रिल या महिन्यामध्ये थ्री फेज वीजेच दिवसाआड पुरवठा करण्यात येतो. दिवसाआड वीज पुरवठा करण्यात येउनही तो सुरळीत व पुर्ण दाबाने होत नसल्याने शेतकरी आक्रमक झाले आहे. उन्हाळा तीव्र होत असताना पीकांना पाण्याची आवष्यकता असते. मात्र वीजेचा लपंडाव, पुर्ण दाबाने वीज पुरवठा न होणे या कारणांमुळे शेतांमधील उभी पीके जळून जाण्याची भिती आहे.

ऐन उन्हाळयाच्या तोंडावर हाता तोंडाशी आलेले कांद्याचे पीक तसेच जनावरांचा चारा, तरकारी या पीकांना मोठया प्रमाणावर पाण्याची आवष्यकता आहे. दिवसाआड वीज पुरवठा व तोही सुरळीत नसल्याने डोळयासमोर पीके जळून जाण्याचा धोका असल्याने महावितरणने यावर तातडीने तोडगा काढावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. वीजेचा प्रश्न माग न लागल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा ग्रामपंचायत सदस्य भिका गाडीलकर व शेतकऱ्यांनी दिला होता.त्यावर लवकरात लवकर हा प्रश्न माग लावण्याची ग्वाही अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

आंदोलनात पंचायत समितीचे मा. सदस्य डॉ. श्रीकांत पठारे, दिनेश बाबर, सामाजिक कार्यकर्ते सुरेश गाडीलकर, संतोष जाधव, संतोष गाडीलकर, संजय गाडीलकर, गणेश गाडीलकर, राजू चत्तर, राहुल गाडीलकर, शहाजी साठे, पांडूरंग गाडीलकर, विकास गाडीलकर, विकास मारूती गाडीलकर, पोपट गायकवाड, सागर गाडीलकर, विकास बढे, नाथा व्यवहारे, संदीप गाडीलकर यांच्यासह शेतकरी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

# नाथाशेठ लंके यांचे निधन

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील प्रगतशील शेतकरी नाथाशेठ देवराम लंके यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते.गावातील सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग होता.**



त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली भाऊ, सुना, भावजया,नातू पणतू असा मोठा परिवार आहे. मुंबई येथील व्यावसायीक बाळासाहेब लंके व प्रकाशशेठ लंके तसेच रंजना दत्तात्रय लाळगे, शारदा गोरख पठारे, शांता नितीन भोर यांचे ते वडील होत. बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक दामुशेठ लंके व प्रगतशील शेतकरी नामदेवराव लंके यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. मुंबई येथील व्यावसायीक विठ्ठल रामभाऊ कवडे, डी.बी. लाळगे कन्ट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय लाळगे, प्रगतशील शेतकरी गोरख पठारे, प्रगतशील शेतकरी नितीन भोर यांचे ते सासरे होत.

# प्रज्ञाशोधच्या गुणवत्ता यादीत डीबीएमचा दबदबा !

## हेगडेवार प्रज्ञाशोध परीक्षेचा निकाल जाहीर




**राळेगण सिध्दी : प्रतिनिधी**

**नगर येथील डॉ. हेगडेवार शिक्षण प्रतिष्ठानच्या वतीने दरवषप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या प्रज्ञा शोध परीक्षेच्या गुणवत्ता यादीत राळेगणसिध्दी येथील डी.बी.एम. इंग्लिश मिडियम स्कुलच्या विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत दबदबा दिसून आला. या निकालामुळे विद्यार्थ्यांच्या बुध्दीमत्तेबरोबरच या स्कुलचा दर्जाही अधोरेखीत झाला आहे.**

इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत स्कॉलरशिप परीक्षेचे आयोजन करण्यात येते. या परीक्षेसाठी जिल्हयातील शाळांमधील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेण्यास मदत करणे, प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिपचे वैशिष्टयपूर्ण तंत्र अवगत करून देणे व तसा सराव उपलब्ध करून देण्याची संधी उपलब्ध करून देणे, प्रज्ञावंत विद्यार्थ्यांमध्ये जिल्हाभर निकोप स्पर्धेचे वातावरण निर्माण करणे व सार्वत्रिक परीक्षा आयोजनाची व प्रशिक्षणाची संधी प्रशिक्षणाथ विद्यार्थ्यांना उपलब्ध करू देण्याच्या हेतूने इयत्ता चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा शोध परीक्षेचे आयोजन करण्यात येते.

यशस्वी विद्यार्थ्यांना विद्या पवळे, जयश्री पठारे-कदम, सुवर्णा डमाळे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण संकुलाच्या प्राचार्या शितल मापारी, संस्थापक जे.डी.मापारी यांनी विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### गुणवत्ता यादीतील विद्यार्थी व त्यांचे गुण

साई सतीश गाडीलकर २७०, प्रांजल रोहीदास पोटे २६८, स्वरा गणेश गाजरे २६६, कार्तिकेय शरद पवळे २६६, पूर्वा कैलास घावटे २६४,शौर्य नागनाथ भापकर २६०, ओम दिलीप गट १६०, विशाल भारत बारवकर २५८, अनघा भाउसाहेब वाबळे २५८, विराज विजय वाबळे २५६, आरोही समीर झगडे २५६, शिवम बाळासाहेब गावडे २५४, प्रज्वल अनिल गावडे २५४.

# मावळेवाडीच्या उपसरपंचपदी नितीन झिटे

## बिनविरोध निवड । मान्यवरांकडून अभिनंदन

**सुपा : प्रतिनिधी**



**मावळेवाडीच्या उपसरपंचपदी नितीन झिटे यांनी नुकतीच बिनविरोध निवड झाली. त्यांच्या निवडीबद्दल मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

मावळेवाडीच्या सार्वत्रीक निवडणूकीदरम्यान सर्व सदस्यांना संधी देण्यासाठी प्रत्येक सदस्याला ठराविक कार्यकाळ देण्याचे धोरण ठरले होते. या धोरणानुसार इतरांना संधी मिळावी म्हणून विद्यमान उपसरपंच सुवर्णा कदम यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. कदम यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर नितिन झिटे यांना संधी देण्याचा निर्णय झाला होता. सरपंच कल्याणी भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या ग्रामपंचायत सदस्यांच्या विशेष बैठकीत उपसरपंच म्हणून झिटे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. त्यानंतर त्यांची उपसरपंच म्हणून बिनविरोध निवड झाल्याचे घोषीत करण्यात आले.

यावेळी मावळत्या उपसरपंच सुवर्णा कदम, ग्रामपंचायत सदस्य राहुल कुरकुटे, कांताबाई मावळे, पुजा पडळकर, मीना मावळे, दत्ता पठारे, मा. उपसरपंच गणेश पठारे, उद्योजक कांतीलाल भोसले, गणेश कुरकुटे, सुभाष भोसले, सुदाम कलाप, विलास गोंडसे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामसेवक गिरवले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. निवडीनंतर ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच ग्रामस्थांच्या वतीने झिटे यांचा सन्मान करण्यात आला.

### विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

सरपंच कल्याणी भोसले व सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ न देता पुढील काळात शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांसाठी राबविणार आहोत. सर्व सदस्य, ग्रामस्थ यांना विश्वासात घेऊन गावाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आपण आहोरात्र परिश्रम घेणार आहोत.

**नितीन झिटे**,नवनिर्वाचित उपसरपंच

# विजयकुमार ठुबे यांना मानद डॉक्टरेट

**कान्हूरपठार : प्रतिनिधी**




**कान्हूरपठारचे रहिवासी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नगर येथील कार्यालयातील स्थापत्य अभियंता म्हणून सेवा निवृत्त झालेले इंजि. विजयकुमार ठुबे यांना त्यांच्या सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल मानद डॉक्टरेटने सन्मानीत करण्यात आले.**

सार्वजनिक बांधकाम विभागात इंजि. विजयकुमार ठुबे यांनी ३६ वर्षे स्थापत्य अभियंता म्हणून योगदान दिल्याबद्दल त्यांना यापूव उत्कृष्ट अभियंता म्हणून सन्मानीत करण्यात आलेले आहे. मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरूषोत्तम खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली इंजि. ठुबे यांनी मराठा सेवा संघाचे कार्य जोमाने पुढे नेले. मराठा समाजाच्या विविध अडचणी दुर करण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. मराठा सेवा संघाच्या माध्यमातून शासकीय सेवाकांच्या प्रश्नांना त्यांनी वाचा तर फोडलीच परंतू मराठा समाजातील सर्वसामान्य घटकांना न्याय देण्याची भूमिका त्यांनी आजवर घेतली आहे. त्यांच्या या सामाजिक कामाची दखल घेत त्यांना मानद डॉक्टरेटने सन्मानित करण्यात आले.

### अमेरिकेच्या विद्यापीठाची डॉक्टरेट

मराठा सेवा संघाच्या माध्यमातून इंजि. विजयकुमार ठुबे यांनी दिलेल्या सामाजिक योगदानाची दखल घेऊन बोस्टन,अमेरिका येथील साउथ वेस्टर्ना अमेरिका युनिव्हर्सिटीने त्यांना मानद डॉक्टरेट सन्मानाने प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

### पदवी सेवा संघाला अर्पण

मराठा सेवा संघाच्या माध्यमातून केलेल्या सामाजिक कामाची दखल घेऊन माझा सन्मान होतो आहे यात मनस्वी आनंद आहे. मराठा सेवा संघाच्या माध्यमातून केलेल्या कामाची दखल घेऊन मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याची ही पहिलीच घटना असावी. ही पदवी मी मराठा सेवा संघाला अर्पण करतो आहे. आपल्या सदिच्छांमुळे हे सर्व घडले.

**इंजि. विजयकुमार ठुबे**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com